Website : www.mscepune.in
Email : mscepune@gmail.com
Phone No. : ०२०-२६१२३०६६/६७

जा.क्र.मरापप/डी.टी.एड् मूल्य/3314
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
नोव्हेंबर २०२१
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१.
दिनांक :-२८/१०/२०२१

प्रति,
१) प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
-----------------------------
जिल्हा -----------------------
२) शिक्षण निरिक्षक मुंबई, (दक्षिण विभाग)

विषय:- डी.एल.एड्. परीक्षा नोव्हेंबर २०२१
मूल्यमापन शिबीराचे ठिकाण व मूल्यमापन अधिकाऱ्यांची
नावे कळविण्याबाबत...

नोव्हेंबर २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या डी.एल.एड्. परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची तपासणी केंद्रीय पध्दतीने करुन घेणे या गोपनीय कामासाठी संबधित अधिव्याख्याता (वर्ग-१/वर्ग २) यांची मूल्यमापन अधिकारी पदासाठी आपण शिफारस करावी. शिफारस केलेले अधिकारी प्रामाणिकपणे काम करणारे व सचोटीचे असावेत. यापूर्वी अशा प्रकारच्या गोपनीय कामाबाबत त्यांचेवर आक्षेप/दोषारोप झालेले नसावेत.

प्रत्यक्ष मूल्यमापन शिबीराचा कालावधी १० दिवसांचा राहील. शिबीरामध्ये सुमारे ६० ते ८० शिक्षक (यात काही महिला शिक्षिका) सहभागी होतील यादृष्टीने खालील सुविधा उपलब्ध असणारी जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था/शासकीय अध्यापक विद्यालय/अनुदानित/खाजगी अध्यापक विद्यालय अथवा सोईनुसार माध्य. उच्च माध्य. शाळेची इमारत निवडावी. शिबीराचे आयोजन दि. ०१/१२/२०२१ ते दि. १०/१२/२०२१ या कालावधीत प्रस्तावित आहे.

- प्रामुख्याने पुढील बाबींचा विचार करुनच मूल्यमापन केंद्र निश्चित करावे.

१) प्रत्यक्ष मूल्यमापनाचे काम करण्यासाठी तीन मोठया खोल्या आवश्यक आहेत.

२) शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना पिण्यासाठी शुध्द व स्वच्छ पाण्याची सोय, स्वच्छतागृह इ. सुविधा उपलब्ध असाव्यात.

३) खोल्यांतून केले जाणारे काम हे गोपनीय स्वरुपाचे असल्याने गोपनीय कागदपत्रांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने हॉलच्या व खोलीतील खिडक्या व दारे व्यवस्थित उघडता व बंद करण्याजोगी असावीत.

४) सदर इमारत सुरक्षिततेच्या दृष्टीने (बंदिस्त) योग्य असावी. भरपूर प्रकाश व्यवस्था असणारी/विजेची सोय असणारी असावी.

५) या शिवाय या कार्यालयाची कागदपत्रे व गोपनीय अभिलेख ठेवण्यासाठी एक प्रशस्त परंतु बंदिस्त खोली मूल्यमापन शिबीराचे जागी उपलब्ध करुन देण्यात यावी. सदर खोली दररोज कुलूप लावून सीलबंद करता येण्याजोगी असावी.

६) शिबीर स्थळाच्या खोल्यामध्ये आवश्यक फर्निचर असावे. टेबल, खुर्च्या तसेच गोपनीय कामकाज चालणाऱ्या खोल्यातून विजेवर चालणारे पंखे असावेत.

निवडलेल्या अध्यापक विद्यालयात मूल्यमापनासाठी बाहेरुन येणाऱ्या अध्यापकांना राहण्यासाठी दोन खोल्या उपलब्ध होतील असे पहावे. तसेच भोजन सुविधा (स:शुल्क) सोय शिबीराचे ठिकाणाजवळ उपलब्ध असावी.

**सदर मूल्यमापन शिबीरासाठी मूल्यमापन अधिकारी म्हणून राजपत्रित (वर्ग-१ / वर्ग-२) अधिकाऱ्यांचीच (ज्येष्ठअधिव्याख्याता / अधिव्याख्याता) नेमणूक करावयाची असून संबंधित अधिकाऱ्यांची माहिती परिषदेच्या deledexam.in या संकेतस्थळावर डाएटच्या Login मधून Online द्वारे भरावी. सदर माहिती भरणेबाबतचा Flow Chart सोबत सादर केलेला आहे. तसेच मूल्यमापन अधिकारी यांना मदतनीस म्हणून दोन सहाय्यक मूल्यमापन अधिकारी यांची नावे आपण आपल्या स्तरावर सोबतच्या प्रोफॉर्म मध्ये सादर करावी. सहाय्यक मूल्यमापन अधिकारी हे शासकीय अध्यापक विद्यालय/अनुदानित खाजगी अध्यापक विद्यालयातील अनुभवी अध्यापक असावेत. सहाय्यक मूल्यमापन अधिकारी यांना किमान १० वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा.**

वरील माहिती, "महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे" च्या deledexam.in या संकेतस्थळावर दि. ०१/११/२०२१ अखेरपर्यंत ई-मेल व्दारे त्वरीत पाठवावी.

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे- १

आपल्या जिल्हयातील मूल्यमापन अधिकारी नियुक्तीसाठी कृतीओघ तक्ता (Flow Chart) खालीलप्रमाणे दिलेला आहे.

deledexam.in या संकेतस्थळावर जाणे.

↓

प्राचार्य, डाएट लॉगीन आय.डी व पासवर्ड टाकावे.

↓

डाएटचे पॅनल ओपन होईल.

↓

पॅनल वरील Evaluation Officer Registration वर क्लिक करावे.

↓

Evaluation च्या माहितीचा बॉक्स दिसेल. (उदा. विभाग, जिल्हा, तालूका, मूल्यमापन अधिकाऱ्याचे नाव, पद, कार्यालयाचा पत्ता, मूल्यमापन केंद्र ठिकाणाचा पत्ता, बँक खाते क्रमांक, बँकेचे नाव व शाखा, IFSC Code No, ई-मेल, मोबाईल क्रमांक इ.) ही माहिती बिनचूक भरावी.

↓

सर्व माहिती भरलेनंतर शेवटी Submit या बटणावर क्लिक करावे.

आपल्या जिल्हयातील सहाय्यक मूल्यमापन अधिकारी नियुक्तीसाठी कृतीओघ तक्ता (Flow Chart) खालीलप्रमाणे दिलेला आहे.

deledexam.in या संकेतस्थळावर जाणे.

↓

प्राचार्य, डाएट लॉगीन आय.डी व पासवर्ड टाकावे.

↓

डाएटचे पॅनल ओपन होईल.

↓

पॅनल वरील Assistant Evaluation Officer Registration वर क्लिक करावे.

↓

Assistant Evaluation च्या माहितीचा बॉक्स दिसेल. (उदा. विभाग, जिल्हा, तालूका, सहाय्यक मूल्यमापन अधिकाऱ्याचे नाव, पद, कार्यालयाचा पत्ता, मूल्यमापन केंद्र ठिकाणाचा पत्ता, बँक खाते क्रमांक, बँकेचे नाव व शाखा, IFSC Code No, ई-मेल, मोबाईल क्रमांक इ.) ही माहिती बिनचूक भरावी.

↓

सर्व माहिती भरलेनंतर शेवटी Submit या बटणावर क्लिक करावे.